# वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर

जुने सचिवालय इमारत, जी.पी.ओ.समोर, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४०००१

ईमेल : textilecomm.ng-mh@gov.in संकेतस्थळ : www.dirtexmah.gov.in

दूरध्वनी : ०७१२ २५६१२४७ फॅक्स : ०७१२ २५२६४०८


जा.क्र.कार्या.८(१)/ वस्त्रो.धोरण/ वीजदर सवलत/ ३८२० /२०२२, दिनांक : 21 JUN 2022

**प्रति,**

--------------------------

--------------------------

--------------------------

**विषय : वस्त्रोद्योग धोरणाअंतर्गत ऑनलाईन संकेतस्थळावर प्राप्त वीजदर सवलत प्रस्तावातील अपूर्ण असलेल्या प्रस्तावांबाबत...**

**संदर्भ :** १. शासन निर्णय क्रमांक धोरण २०१८/ प्र.क्र. १६४९/टेक्स-५, दिनांक २१/१२/२०१८

२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण -२०१८/ प्र.क्र. १६४९ /टेक्स-५, दिनांक २२ ऑक्टोबर २०२१.

शासन निर्णय दि. १५ फेब्रुवारी, २०१८ अन्वये, राज्याचे वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात आले असून सदर धोरणाअंतर्गत वस्त्रोद्योग प्रकल्पांना सन २०१८ ते २०२३ या कालावधीकरीता वीज सवलत जाहीर करण्यांत आली होती. त्याअनुषंगाने संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये, राज्यातील वस्त्रोद्योग घटकांना सन २०१८ ते २०२३ या कालावधीकरीता वीजदर सवलत लागू करण्यात आली आहे.

वीजदर सवलत मिळण्याकरीता वस्त्रोद्योग घटक शासनाने वेळोवेळी विहीत केलेले कागदपत्रे आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरूपात सादर करीत असतात. सदर ऑनलाईन प्रस्तावाची आयुक्तालयस्तरावर सुक्ष्म तपासणी करून प्रस्ताव मंजूरीस्तव शासनास सादर करण्यात येतात.

सद्यस्थितीत आयुक्तालयाचे ऑनलाईन संकेतस्थळावर ११३४४ वस्त्रोद्योग घटकांनी वीज सवलतीचे ऑनलाईन प्रस्ताव सादर केलेले आहेत. सदर प्राप्त प्रस्तावांची आयुक्तालयस्तरावर सुक्ष्मतपासणी केली असता काही वस्त्रोद्योग घटकांनी नोंदणी फॉर्म भरतांना एकाच नावाने एकापेक्षा जास्त नोंदणी फॉर्म भरून Duplication केल्याचे तसेच दि.०१.०१.२०२२ पर्यंत ९५६ वस्त्रोद्योग घटकांनी अपूर्ण प्रस्ताव सादर केल्याचे निर्दशनास येत आहे.

सबब, वस्त्रोद्योग धोरणाअंतर्गत वस्त्रोद्योग प्रकल्पांना सन २०१८ ते २०२३ या कालावधीकरीता वीजदर सवलत लागू करण्यात आली असली तरी धोरणाअंतर्गत वीज सवलतीचा उर्वरीत कालावधी पाहता अद्यापपर्यंत ऑनलाईन संकेतस्थळावर प्राप्त ९५६ अपूर्ण प्रस्ताव पूर्ण न करणे बाब योग्य नाही. तरी ऑनलाईन संकेतस्थळावर आपल्या वस्त्रोद्योग घटकांचे Registration करतांना Duplication झाले असल्यास Duplicate Registration रद्द करण्यात यावे. तसेच दि.०१.०१.२०२२ पर्यंत सादर केलेल्या प्रस्तावातील ९५६ अपूर्ण प्रस्ताव पैकी अपूर्ण असलेले आपल्या घटकांचे वीज सवलत प्रस्तावातील शासनाने विहीत केलेली माहिती तात्काळ दि. १५ जूलै, २०२२ रोजीपर्यंत संकेतस्थळावर पूर्ण करण्यात यावी. उक्त तारखेनंतरही आपल्या घटकाचे प्रस्ताव संकेतस्थळावरअपूर्ण दिसल्यास आयुक्तालयस्तरावरून सदर वीज सवलत प्रस्तावांची नोंदणी रदद करण्यात येईल याची आपण नोंद घेण्यात यावी.

**(शीतल तेली-उगले)** भा.प्र.से.
आयुक्त, वस्त्रोद्योग,
महाराष्ट्र राज्य,नागपूर

# वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर

जुने सचिवालय इमारत, जी.पी.ओ.समोर, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४०००१

ईमेल : textilecomm.ng-mh@gov.in संकेतस्थळ : www.dirtexmah.gov.in

दूरध्वनी : ०७१२ २५६१२४७ फॅक्स : ०७१२ २५२६४०८


जा.क्र.कार्या.८(१)/ वस्त्रो.धोरण/ वीजदर सवलत/ ३८२८ /२०२२, दिनांक : जून, २०२२

21 JUN 2022

प्रति,

--------------------------

--------------------------

--------------------------

**विषय : वस्त्रोद्योग धोरणाअंतर्गत ऑनलाईन संकेतस्थळावर प्राप्त वीजदर सवलत प्रस्तावांतील त्रुटींची पुर्तता करण्याबाबत...**

**संदर्भ :** १. शासन निर्णय क्रमांक धोरण २०१८/ प्र.क्र. १६४९/टेक्स-५, दिनांक २१/१२/२०१८

२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण -२०१८/ प्र.क्र. १६४९ /टेक्स-५, दिनांक २२ ऑक्टोबर २०२१.

शासन निर्णय दि. १५ फेब्रुवारी, २०१८ अन्वये, राज्याचे वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात आले असून सदर धोरणाअंतर्गत वस्त्रोद्योग प्रकल्पांना सन २०१८ ते २०२३ या कालावधीकरीता वीज सवलत जाहीर करण्यात आली होती. त्याअनुषंगाने संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये, राज्यातील वस्त्रोद्योग घटकांना सन २०१८ ते २०२३ या कालावधीकरीता वीजदर सवलत लागू करण्यात आली आहे.

वीजदर सवलत मिळण्याकरीता वस्त्रोद्योग घटक शासनाने वेळोवेळी विहीत केलेले कागदपत्रे आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरूपात सादर करीत असतात. सदर ऑनलाईन प्रस्तावाची आयुक्तालयस्तरावर सुक्ष्म तपासणी करून प्रस्ताव मंजूरीस्तव शासनास सादर करण्यात येतात.

सद्यस्थितीत आयुक्तालयाचे ऑनलाईन संकेतस्थळावर ११३४४ वस्त्रोद्योग घटकांनी वीज सवलतीचे ऑनलाईन प्रस्ताव सादर केलेले आहेत. सदर प्राप्त प्रस्तावांची आयुक्तालय स्तरावर सुक्ष्मतपासणी केली असता काही वस्त्रोद्योग घटकांनी नोंदणी फॉर्म भरतांना एकाच नावाने एकापेक्षा जास्त नोंदणी फॉर्म भरून Duplication केल्याचे तसेच दि.०१.०१.२०२२ पर्यंत प्राप्त ५५०२ वस्त्रोद्योग घटकांच्या प्रस्तावात त्रुटी असल्याने सदर त्रुटींची पुर्तता करण्याबाबत संबंधित घटकास ऑनलाईन कळवूनही उक्त घटकांनी अद्यापही त्रुटींची पुर्तता केलेली नसल्याचे निर्दशनास येत आहे.

सबब, वस्त्रोद्योग धोरणाअंतर्गत वस्त्रोद्योग प्रकल्पांना सन २०१८ ते २०२३ या कालावधीकरीता वीजदर सवलत लागू करण्यात आली असली तरी धोरणाअंतर्गत वीज सवलतीचा उर्वरीत कालावधी पाहता अद्यापपर्यंत ५५०२ वस्त्रोद्योग घटकांनी प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता न करणे ही बाब योग्य नाही. तरी ऑनलाईन संकेतस्थळावर वस्त्रोद्योग घटकांचे Registration करतांना आपल्या वस्त्रोद्योग घटकाचे Duplication झाले असल्यास Duplicate Registration रदद करण्यात यावी. तसेच ऑनलाईन संकेतस्थळावर दि.०१.०१.२०२२ पर्यंत प्राप्त ५५०२ प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता न केलेल्या आपल्या वस्त्रोद्योग घटकांचे वीज सवलतीचा प्रस्तावात शासनाने विहीत केलेली माहितीसह त्रुटींची पुर्तता तात्काळ दि. १५ जूलै, २०२२ रोजीपर्यंत करण्यात यावी. व तदनंतरही आपल्या घटकांचा प्रस्ताव अपूर्ण दिसल्यास अथवा त्रुटींची पुर्तता न केल्यास आयुक्तालयस्तरावरून सदर वीज सवलत प्रस्तावांची नोंदणी रदद करण्यात येईल याची आपण नोंद घेण्यात यावी.

**(शीतल तेली-उगले)** भा.प्र.से.

आयुक्त, वस्त्रोद्योग,

महाराष्ट्र राज्य,नागपूर